महाराष्ट्र शासन

क्र.डब्ल्यूबीएसटी २०१५/प्र.क्र.१७/का.७
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ मार्च, २०१५.

विषय :- भागीदारी संस्थांना नोंदणी व घटनेतील बदलाबाबतचे आक्षेपपत्र ईमेलद्वारे पाठविण्याबाबत.

संदर्भ :- १.निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.आस्था ३८११/संगणकीकरण/(१४८/११)/दोन/८७, दिनांक ९.१.२०१५.
२.शासन परिपत्रक क्र.मुसका २०११/५४/का.१, दिनांक ११.२.२०११

शासन ज्ञापन :-

राज्याचे प्रशासन गतीमान व कार्यक्षम व्हावे याकरिता राज्याच्या ई-गव्हर्नन्स धोरणांतर्गत शासकीय कामकाजाची निर्णय प्रक्रिया अधिक गतीमान करण्याकरिता शासकीय कार्यालयात ई-मेल प्रणालीचा वापर संदर्भ क्र.२ अन्वये अनिवार्य करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने निबंधक भागीदारी संस्था, मुंबई व त्यांच्या अधिनस्त असलेल्या उप निबंधक, भागीदारी संस्था, नागपूर/पुणे/औरंगाबाद यांचे कार्यालयात भागीदारी संस्थेच्या नोंदणीकरिता व नोंदणीकृत भागीदारी संस्थेच्या घटनेतील बदलांची नोंद घेण्याचे काम माहे "फेब्रुवारी २०१३" पासून ऑनलाइन पद्धतीने करण्याचे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

२. सदर ऑनलाइन पद्धतीत भागीदारी संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर नोंदणीकृत प्रमाणपत्राची (नमुना ह) संगणकीय प्रत तसेच नोंदणी प्रस्तावात काही त्रुटी असल्यास त्याबाबतच्या आक्षेपपत्राची संगणकीय प्रत पोस्टाने निबंधक/उप निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालयाकडून संबंधित संस्थेस पाठविण्यात येते. सदर प्रक्रियेत

पोस्टेज खर्च व वेळेचा अपव्यय होतो. तथापि, सदर प्रक्रियेत होणारा अतिरिक्त खर्च व वेळेचा अपव्यय टाळण्याकरिता शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, निबंधक व उप निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद या अधिनस्त असलेल्या कार्यालयात नोंदणीकरिता प्राप्त झालेली भागीदारी संस्थेची मंजूर नोंदणीकृत प्रमाणपत्रे (नमुना ह)/आक्षेपपत्रे या आदेशान्वये ई-मेल प्रणालीद्वारे संबंधित भागीदारी संस्थेस पाठविण्यात येतील. यापुढे सदर नोंदणीकृत प्रमाणपत्राच्या व आक्षेपपत्राच्या प्रती (Hard copy) उपलब्ध करुन दिल्या जाणार नाहीत. सदर शासन आदेशान्वये सदर नोंदणीकृत प्रमाणपत्रे/आक्षेपपत्रे ही online पद्धतीने संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मा.ना.पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, सहावा मजला, चेतना महाविद्यालयाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

सहायक निबंधक भागीदारी संस्था, सर्व्हे क्र. ४७/३०, सरस्वती पार्वती भवन, दुसरा मजला, लोकेश हॉटेलच्या मागे, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे-सातारा मार्ग, पुणे ४११ ००९,

सहायक निबंधक भागीदारी संस्था, ११८, जुने सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

सहायक निबंधक भागीदारी संस्था, पाटील प्लाझा इमारत, पीर बाजार, पोलीस स्टेशनजवळ, एकनाथ नगर मार्ग, उस्मानपुरा, औरंगाबाद - ४३१००५.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,

कार्यासन अधिकारी/कार्यासन २०, २३, २४ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,

निवड नस्ती/का.७.